सकाळ




टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ : पदवी प्रदान सोहळ्यात डॉ. माधव गाडगीळ, डॉ. अनिल अवचट आणि उत्तम पाचर्णे यांना डी.लिट. पदवी देण्यात आली. या वेळी डॉ. गाडगीळ, डॉ. अवचट, पाचर्णे, डॉ. दीपक टिळक आणि अभिजित जोशी.

# देशाच्या संरक्षणासाठी हातभार लावा : पाचर्णे

## टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठाचा पदवी प्रदान सोहळा

**पुणे, ता. १६ : ''देशाच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने हातभार लावला पाहिजे. स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांचा विसर पडताना दिसत आहे. परंतु, याबाबत आता कलाकारांनी मरगळ झटकून समाजाच्या जनजागृतीसाठी पुढाकार घेतला पाहिजे,'' असे मत ललित कला अकादमीचे अध्यक्ष उत्तम पाचर्णे यांनी व्यक्त केले.**

टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठाचा ३०वा पदवी प्रदान सोहळा शनिवारी झाला. पाचर्णे यांच्यासह ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व लेखक डॉ. अनिल अवचट यांना या वेळी विद्यापीठातर्फे डी. लिट. पदवी देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, कुलसचिव डॉ. अभिजित जोशी, अधिष्ठाता हेमंत अभ्यंकर, डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते. ७६ विद्यार्थ्यांना पीएच. डी., तर १२ विद्यार्थ्यांना एम. फिल. पदवी प्रदान करण्यात आली. कौशल्य विकास शाखेचे २२६ विद्यार्थी, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे चार हजार ५६६ विद्यार्थी, अशा एकूण चार हजार ८८० विद्यार्थ्यांना या वेळी पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. अवचट म्हणाले, ''प्रत्येकामध्ये चांगला माणूस दडलेला असतो. त्या माणसाला बाहेर काढणे महत्त्वाचे असते. ज्ञानाचा शोध घेण्याची वृत्ती माणसात जागृत व्हायला हवी.'' विद्यापीठाने जपान येथील सात विद्यापीठांसोबत शैक्षणिक करार केले आहेत. त्यामुळे विद्यापीठात जपानी भाषाविषयक विविध अभ्यासक्रम तयार केल्याची माहिती या वेळी विद्यापीठातर्फे देण्यात आली.

> निसर्गाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला असून, याबाबत निश्चितच खंत वाटते. राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांना वन हक्क कायद्यानुसार सामूहिक वन जमिनी मिळाल्या आहेत. याचा फायदा जवळपास अकराशे गावांना होणार आहे. या भागातील नागरिक जमिनीचा सांभाळ करीत निसर्गदेखील रक्षण करणार आहेत.
>
> - डॉ. माधव गाडगीळ,
> ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ